**सं. फौ. ख.क्र. ३६४/२०१८** **निशाणी क्र. ३६**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ ची जबानी**

मी शपथेवर कथन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | - | प्रकाश यादव शिंगाडे |
| वय | - | ४९ वर्षे- |
| कामधंदा | - | शेती |
| राहणार | - | नांदगाव, ता.नांदगांव, जि.नाशिक. |

**सरतपास सरकारी अभियोक्ता श्री.चेतन जायलवाळ यांचे मार्फत-**

**१.** मी आरोपी क्र. २ यास ओळखतो. तो आमचे गावातील आहे. दि. २४/०६/२०१८ रोजी मी कासारी गावातील स्टँडवर होतो. पुढे काय झाले हे मला आठवत नाही. पोलिसांनी माझा जबाब घेतला नव्हता.

**सरकारी अभियोक्ता यांनी भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार साक्षीदाराचा उलटतपास घेण्याची परवानगी मागितली. ती देण्यात आली.**

**२.** सन २०१८ मध्ये मी ड्रायव्हर म्हणून काम करत होतो. माझी क्रुझर नावाची प्रवासी गाडी होती व त्या गाडीतून येणाऱ्या उत्पन्नातून मी माझ्या कुटुंबाचे उदरनिर्वाह करीत होतो. हे मला आठवत नाही की, दि. २४/०६/२०१८ रोजी मी कासारी बस स्टँडवर माझी गाडी घेऊन उभा होतो. काळू इप्पर व रमाकांत सानप हे माझे गावातील असल्याने मी त्यांना ओळखतो. हे मला लक्षात नाही की, ते दोघे जण एका महिलेला माझ्या गाडीजवळ घेऊन आले. हे मला आठवत नाही की, त्या महिलेला डोक्याला लागलेले होते व तिला नांदगाव येथील सरकारी दवाखान्यात घेऊन जायचे आहे असे त्यांनी सांगितले. हे मला माहिती नाही की, ती बाई बेशुध्द झाली होती व तिला मी सर्वांसोबत नांदगाव येथील सरकारी दवाखान्यात घेऊन गेलो. मी विजय सिताराम सानप यांना ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, विजय सानप व आरोपी क्र. २ यांची शेती एकमेकास लागून आहे. हे मला सांगता येणार नाही की, सन २०१८ मध्ये

आरोपी क्र. २ च्या शेतात नवीन विहिरीचे काम चालू होते. हे मला आठवत नाही की, आरोपी क्र. १ विहिरीच्या कामाकरीता सुरंग लावून बार उडविण्याचे काम करीत होता. हे मला माहित नाही की, आरोपी क्र. १ ने कोणतीही सावधगिरी न बाळगता बार उडविल्याने दगड उडवून फिर्यादीच्या पत्नीच्या डोक्यात लागला. हे म्हणणे खरे आहे की, विजयच्या पत्नीचे नाव अलकाबाई आहे. हे मला माहित नाही की, दि. २७/०६/२०१८ रोजी अलकाबाई हिचे उपचार चालू असताना निधन झाले. अलकाबाई हिच्या मार लागण्याला व तिच्या निधनाला आरोपी क्र. १ व २ हे जबाबदार असू शकतात. हे मला सांगता येणार नाही की, आरोपी क्र. १ हा आरोपी क्र. २ कडे तथाकथीत घटनेवेळेस ड्रायव्हर म्हणून काम करीत होता. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ हा राजस्थान येथील रहिवासी आहे. आरोपी क्र. २ हा माझ्या चुलत बहिणीचा मुलगा आहे. हे म्हणणे बरोबर होणार नाही की, तो माझा भाचा लागत असल्यामुळे त्याला शिक्षा होऊ नये असे मला वाटते. हे मला सांगता येणार नाही की, विजय सानप यांनी आरोपींविरुध्द तथाकथीत घटनेबाबत फिर्याद दिली होती. माझे व आरोपी क्र. २ चे चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझे व त्याचे चांगले संबंध असल्यामुळे मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझे सांगण्याप्रमाणे जबाब लिहून घेतला होता.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. वाय. आर. शेख यांचे मार्फत-**

३. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथीत घटना मी प्रत्यक्ष पाहिली नाही, ती माझ्या समोर घडलेली नाही व त्याबाबत मला काहीही माहिती नाही. मी पोलिसांना कधी भेटलो देखील नाही व माहिती देखील दिली नाही. माझे गावातील प्रत्येकाशी चांगले संबंध आहेत.

**उलटतपास – पूर्ण.**

**फेरतपास - नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

sd/-

(जे. एम. अग्निहोत्री)
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग
**नांदगांव.**
दि.२३/०९/२०२५

माझे समक्ष

sd/-

(जे. एम. अग्निहोत्री)
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग
**नांदगांव.**